## मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ, मुंबई.

### बुधवार, दि. १० जून १९९८ रोजी झालेल्या ५३ व्या बैठकीचा

### कार्यवृत्तांत

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ५३ वी बैठक, बुधवार, दिनांक : १० जून १९९८ रोजी दुपारी ११.०० वाजता गृहनिर्माण भवन, सभागृह, तिसरा मजला येथे संपन्न झाली.

या बैठकीस पुढील मान्यवर उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १. | ॲडव्होकेट श्री मधु चव्हाण | सभापती |
| २. | श्रीमती वंदना खुल्लर | मुख्य अधिकारी |
| ३. | श्री. वि.म. कोकणे | उपसचिव/महाराष्ट्र शासन |
| ४. | श्री. विनोद घोपकर | सदस्य |
| ५. | श्री. चंद्रकांत विश्वासराव | ,, |
| ६. | ,, अमोद उसपकर | ,, |
| ७. | ,, भालचंद्र ठाकूर | ,, |
| ८. | ,, दगडू सकपाळ | ,, |
| ९. | ,, देवदास साटम | ,, |
| १०. | ॲडव्होकेट श्री. प्रकाश भुवड | ,, |
| ११. | श्री. दिलीप गोडांबे | ,, |
| १२. | श्री. गणेश तिकोने | ,, |
| १३. | डॉ. विनोद मेहता | ,, |
| १४. | श्री. दाजी[गोपाळ]मोडक | ,, |
| १५. | प्रमुख अभियंता, म.न.पा. यांचे प्रतिनिधी | निमंत्रक |
| १६. | उपकर निर्धारक व संकलक [शहरे], म.न.पा. | ,, |

बैठकीच्या सुरवातीस मा.सभापती यांनी उपस्थित सर्व सन्मा.सदस्यांचे व अधिकारीवर्गाचे स्वागत करुन मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या मुख्य अधिकारी पदी नव्याने नियुक्त झालेल्या श्रीमती वंदना खुल्लर यांची सर्व सन्मा. सदस्यांना ओळख करुन देउन सर्वांच्या वतीने त्यांना पुष्पगुच्छ देउन सर्वांचे मन:पूर्वक स्वागत केले.

श्री. नाचणकर, सहमुख्य अधिकारी यांनी अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला की, मा. सभापती श्री. मधु चव्हाण यांना शासनाने राज्यमंत्र्यांचा दर्जा दिलेला आहे.

[ब] मुंबईच्या महापौर परिषदेचे प्रथम महापौर म्हणून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन्माननीय सदस्य श्री. नंदू साटम यांची नियुक्ती झाल्याबद्दल आजच्या बैठकीमध्ये सर्वानुमते त्यांचे अभिनंदनाचा ठराव संमत करण्यांत आला.

वरील अभिनंदनाच्या ठरावानंतर मा. सभापती यांनी सचिव यांना आजच्या बैठकीस सुरुवात करण्याच्या सूचना दिल्या.

सचिव यांनी उपस्थितांचे स्वागत करुन बैठकीच्या कामकाजास सुरुवात केली.

बाब क्रमांक : ५३/१

विषय :- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या दि. २४.४.९८ रोजी संपन्न झालेल्या ५२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करणेबाबत.

विषयांकित कार्यवृत्तांत पृष्ठ क्र. १ ते १०९ वर स्थायी करण्यासाठी सादर करण्यात आला आहे.

मा. सदस्य श्री. खोपकर यांनी असे निदर्शनास आणले की, मागील बैठकीस ते उपस्थित असूनही त्यांचे नांव उपस्थित सन्माननीय सदस्यांच्या यादीत नाही. यावर सचिव यांनी झालेल्या चुकीबद्दल मा. सदस्य श्री. खोपकर यांच्याकडे दिलगीरी व्यक्त केली.

यावर मा. सभापती यांनी कार्यवृत्तांतात मा. सदस्य श्री. खोपकर उपस्थित होते अशी सुधारणा करुन नोंद घेण्याच्या सूचना दिल्या.

वरील चर्चेअंती मा. सभापती यांनी ५२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते स्थायी करण्यात येत असल्याचे जाहीर केले.

बाब क्रमांक : ५३/२ [पुनर्बांधणी विभाग]

[१] विषय :- इ.क्र. ३-५-५-अे, ५-बी व ५-सी डॉ. भालेराव मार्ग, डी-विभाग, मुंबई या संयुक्त पुनर्बांधणीसाठी इ.क्र. ५-सी, डॉ. भालेराव मार्ग या इमारतीस ८८[३] "ब" चे प्रमाणपत्र मिळणेबाबत.

विषयांकित प्रस्ताव पृ.क्र. १११ ते ११७ वर सादर करण्यात आला आहे.

मा. सभापती यांनी सदर प्रस्तावाची माहिती देताना सांगितले की, गिरगांव विभागातील दोन इमारती मंडळाच्या ताब्यात आलेल्या असून बाजूची इमारत घेऊन तेथे संयुक्त पुनर्बांधणी योजना राबविण्यात येत आहे. तरी सदर इमारत ८८[३] अ मध्ये घोषित केलेली नसल्याने संयुक्त पुनर्बांधणी करावयाची असल्याने ती म्हाडा कलम ८८ [३] ब अंतर्गत घोषित करण्याचा प्रस्ताव आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

[२] विषय :- इ.क्र. ३६-बी, चंपागल्ली [गणेश भुवन] काळबादेवी, या इमारतीच्या पुनर्बांधणीच्या निविदाबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. ११९ ते १२५ वर सादर करण्यात आलेला आहे.

मा सभापती यांनी माहिती दिली की, गेल्यावर्षी गणेश भुवन ही इमारत कोसळली होती. सदर इमारतीची पुनर्रचना त्याच जागेवर करण्यात यावी असा निर्णय शासनाने घेतला होता. त्यानुसार पुढील प्रक्रिया पूर्ण करुन सदर कामाच्या निविदा मागविण्यात आलेल्या आहेत. परंतु मंडळाच्या अपेक्षेप्रमाणे बांधकाम खर्चाचा दर रु ५४५.३० आहे. परंतु ठेकेदाराने रु. ७६०/- दर दिलेला आहे व त्यानुसार ३९ % ने मूळ निविदेच्या जास्त आहे. सदर बाब ही त्यांना स्वत:ला पटलेली नाही तसेच मंडळाच्या अधिका-यांनाही पटलेली नाही. जेव्हा निम्नतम निविदा ही मंडळाच्या अपेक्षेपेक्षा जास्त आहे असे वाटले तर अभियंत्यांना वाटाघाटीचे [निगोसिएशन] अधिकार आहेत.

यावर मा. सदस्य श्री. विश्वासराव यांनी मेस्त्री कन्स्ट्रक्शनचा उल्लेख नसल्याचे निदर्शनास आणले. यावर मा. सभापती यांनी माहिती दिली की, निविदा शर्तीसह असल्यामुळे उघडण्यात आलेली नाही. श्री. करांडे, उपमुख्य अभियंता यांनी माहिती दिली की, त्यांच्या शर्ती अशा होत्या की, त्यांना फुकट पाणी द्यावे, महानगरपालिका आकार मंडळाने भरावेत, इत्यादी.

उपमुख्य अभियंता श्री. करांडे यांनी असे निदर्शनास आणले की, विषयांकित कामाच्या निविदा ३९.५ % ने जास्त असल्यामुळे सदर निविदा मंजूर करण्याचे अधिकार प्राधिकरणास आहेत, मंडळाला नाहीत. तसेच मुख्य अभियंता यांनीही अशी शिफारस केलेली आहे की, ठेकेदाराबरोबर वाटाघाटी करुन पहाव्यात व मंडळाच्या अपेक्षित दरामध्ये ते काम करण्यास तयार नसतील तर पुन्हा निविदा मागवाव्यात. त्यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, मंडळातर्फे जी. एम. काकडे

वास्तुशास्त्रज्ञ यांना सल्लागार म्हणून या कामावर नेमण्यात आले असून त्यांनी २३.७७% ने जादा निविदा असली तर स्विकारण्यास हरकत नाही अशी शिफारस केलेली आहे.

मा. सदस्य श्री. सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, बांधकाम साहित्य रात्रीच्या वेळी डोक्यावरुन घेउन जावे लागेल व पोहोच रस्ता अत्यंत अरुंद आहे, म्हणून त्यांनी जादा दर लावलेला दिसतो.

मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की सदर भाग हा दिवसभर गजबजलेला असतो, त्यामुळे काम करणे कठीण आहे. परंतु लोकांचे पुनर्वसन करणे आवश्यक असल्याने विशेष बाब म्हणून त्याच ठिकाणी इमारत बांधण्यास शासनाने परवानगी दिलेली आहे. हे सगळे गृहीत धरुनसुध्दा निविदा ३९ % ने जादा आहे हे प्राप्त परिस्थितीमध्ये योग्य वाटत नाही.

मा. सदस्य सर्वश्री उसपकर आणि विश्वासराव यांनी अशी विचारणा केली की, या इमारतीच्या आजूबाजूला अशा काही इमारती आहेत की, ज्या ८८[३] ब खाली घेता येतील ? व त्यांची एकत्रित संयुक्त पुनर्बांधणी हाती घेण्यास काय हरकत आहे? कारण तेथील लोकांना पर्यायी जागा तर दिलेल्या आहेतच. ठेकेदारास ३९ % जादा देण्यापेक्षा सदर इमारत संयुक्त पुनर्बांधणी योजने अंतर्गत पुनर्रचित केलेली बरी.

यावर मा. सभापती यांनी निदर्शनास आणले की, शासनानेच सदर इमारतीची पुनर्बांधणी करण्याचे आश्वासन दिलेले आहे.

मा. सदस्य श्री. तिकोने यांनी असे मत व्यक्त केले की, बाजूची इमारत जर संयुक्त पुनर्बांधणी योजनेमध्ये घेण्यासाठी आवश्यक असेल तर, शासनाने दिलेले आश्वासन लक्षात घेउन संयुक्त पुनर्बांधणी करण्याच्या दृष्टीने बाजूच्या इमारतीची भूसंपादन प्रक्रीया त्वरीत सुरु करावी.

मा. सदस्य श्री. सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, सदर इमारतीबाबत आजच्या बैठकीत ठेवण्यात आलेला प्रस्ताव मंजूर करणे योग्य होणार नाही. पुन्हा नव्याने निविदा मागविण्यात याव्यात असे स्पष्ट केले. तसेच संयुक्त पुनर्बांधणी योजनेसाठी बाजूच्या इमारती चांगल्या असतील तर त्या जबरदस्तीने घेणे योग्य होणार नाही.

उपसचिव श्री. कोंकणे यांनी असे मत व्यक्त केले की, मंडळासमोर सादर करण्यात आलेला प्रस्ताव हा फारच मर्यादित स्वरुपाचा आहे. सदर ठेकेदाराला वाटाघाटीसाठी बोलाउन मुख्य अभियंता यांनी शिफारस केल्याप्रमाणे ठराविक टक्क्यापर्यंत ठेकेदार काम करण्यास तयार असेल तर त्याच्याशी मंडळाच्या अधिका-यांनी

वाटाघाटी कराव्यात आणि तो किती टक्क्यांपर्यंत काम करावयास तयार आहे याची माहिती पुढील बैठकीत ठेवण्यात यावी. न पेक्षा पुन्हा नव्याने निविदा मागविण्याकरिता काही कालमर्यादा घालून अधिकाऱ्यांना आवश्य निर्देश द्यावेत. म्हणजे ते काम रखडून रहाणार नाही.

मा. सभापती यांनी सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबत खुलासा करुन असे निदर्शनास आणले की, विषयांकित इमारत कोसळली तेव्हा मा. मुख्यमंत्री, मा. गृहनिर्माण मंत्री, राज्यमंत्री, गृहनिर्माण व शासनाने फ्लोअरवर आश्वासन दिले आहे की, ही इमारत नव्याने पुनर्रचित करण्यात येईल. कारण त्यामध्ये रहिवाशांचा दोष नाही, तर मंडळातर्फे १३-१४ वर्षापूर्वी बांधण्यात आलेली ही इमारत मंडळाच्या दोषामुळे, उदा. ठेकेदार, वास्तुशास्त्रज्ञ, त्यावेळचे संबंधित अभियंते यांचे झालेले दुर्लक्ष यामुळे ही इमारत कोसळली आहे. त्यामुळे प्राप्त परिस्थितीनुरुप विशेष बाब म्हणून हया इमारतीची पुनर्रचना करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यानुसार सदर कामाच्या निविदा मागवून त्या स्विकारण्या-बाबत आज मंडळासमोर प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. मंडळाने निर्णय द्यायचा आहे की, निविदा निम्नतम असली तरी चालेल, पैसे खूप लागले तरी चालतील, प्रस्ताव मंजूर करुन प्राधिकरणाकडे पाठवावा. किंवा नियमानुसार ठेकेदाराशी वाटाघाटी करुन जर ठेकेदार कमी टक्क्यांनी काम करावयास तयार असेल ~~किंवा कमी टक्क्यांनी काम करावयास तयार असेल~~ किंवा कमी टक्क्यांनी काम करावयास तयारच नसेल किंवा सदर ठेकेदारास काम न देता पुन्हा नव्याने निविदा मागविण्यात याव्यात. मा. [illegible] द्यावयाचा आहे.

यावर सर्व सन्मा. सदस्यांनी एकमताने नव्याने निविदा मागविण्यात याव्यात असे मत व्यक्त केले.

उपमुख्य अभियंता [पुनर्रचना], श्री. कराडे यांनी असे निदर्शनास आणले की, गणेश भुवन इमारतीच्या पुनर्बांधणीच्या ३९ % जास्त असलेली निविदा प्राधिकरणा-कडे पाठवावी लागेल. कारण ती मंडळाच्या स्तरावर नामंजूर/वाटाघाटी करता येणार नाही.

यावर मा. सभापती यांनी निदर्शनास आणले की, एकूण ५ कोटीच्या आतील व २० % पर्यंत जास्त असलेल्या निविदांबाबत निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार मंडळास आहे. त्यानुसार सदर निविदा जर रु. ५ कोटीच्या आतील आहे परंतु २० % च्या वरील आहे. तर ती मंडळासमोर आणलीच का ? याबद्दल त्यांनी तिव्र नाराजी

खरी असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे याबाबतही संक्रमण गाळे विभागाच्या संबंधित अधिका-यांनी माहिती द्यावी अशा मा. सभापती यांनी सूचना दिल्या. त्यांनी पुढे असे निदर्शनास आणले की, मागे बंद गाळयांबाबत त्या गाळयांवर नोटीस लावा की, तपासणीमध्ये तुमचा गाळा बंद आढळला असून तुम्ही अधिकृत रहिवाशी असाल तर संबंधित भाडेवसुलीकार, प्रमुख भाडेवसुलीकार किंवा मिळकत व्यवस्थापक यांच्याशी संपर्क करुन आपण अधिकृत रहिवाशी आहात असे सिध्द करावे अन्यथा आपणास तीन दिवसात गाळयातून बाहेर काढण्यात येईल. अन्यथा सदर अनधिकृत भाडेकरु विरुध्द पोलीसात तक्रार दाखल करावी. असे असूनही गेल्या महिन्याभरात कारवाई का झाली नाही ? याबाबत मुख्य अधिकारी यांनी चौकशी करावी.

मा. सभापती यांनी अधिक माहिती देताना सांगितले की, ~~संक्रमण शिबिरातील~~ ३२ गाळयांपैकी १० गाळयांची तपासणी केली असता २ गाळे बरोबर आढळले, ~~७ गाळे~~ अनधिकृत आढळले व एक गाळा संशयास्पद आढळला. उरलेले २२ गाळे आज किंवा उद्या तपासण्यात येतील. यावरुन असे दिसते की, प्रशासनाचे काम ठप्प झालेले असून कुलाबा संक्रमण शिबिरावर प्रशासनाचे कोणतेही नियंत्रण नाही असाच अर्थ निघतो.

मा. सभापती यांनी पुढे माहिती दिली की, त्यांनी संक्रमण शिबिराच्या अधिका-यांना काही इमारतींचे नंबर देऊन, दलालांचीही नांवे त्यांनी कळविली. ते दलाल मंडळाच्या गाळयाचे टाळे तोडून गाळयात रहातात. त्यांच्या विरुध्द कारवाई करुन त्यांना अटक करावयास सांगूनही महिनाभर तशी कारवाई झालेली नाही. मा. मुख्यमंत्री सुध्दा घुसखोरांना बाहेर काढण्यासाठी अनुकूल आहेत. शिवाय तेथील घुसखोरांना बाहेर काढण्यासाठी शासनाने स्थगिती दिलेली नाही. दिलीप नांवाचा दलाल चाळ नं. ७, खो. क्र. ५ मध्ये रहातो असे कळवूनही कारवाई जाणून-बूजून न करण्यामध्ये संबंधित प्रमुख भाडेवसुलीकार, व भाडेवसुलीकार यांचा हात आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे.

मा. सदस्य श्री. सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, सदर विभागाचे उपमुख्य अधिकारी व इतर संबंधित अधिकारी मंडळाच्या बैठकीत हजर असतात. व अनेक बैठकांमध्ये या विषयासंबंधी अनेकवेळा पोटतिडकीने चर्चा होते. परंतु निर्णय मात्र काही होत नाही. म्हणून चर्चेला काही अर्थ रहात नाही.

वरील विषयास अनुसरुन मा. सभापती यांनी उदाहरण देऊन सांगितले की, लालबाग येथील राजकोटवाला चाळ व बच्चू परदेशी चाळ या दोन चाळीतील लोक संक्रमण शिबिरात रहावयास गेलेले आहेत. त्यापैकी काही लोकांनी स्वत:चे संक्रमण

...... ९/-

गाळे भाडयाने दिलेले आहेत व जुन्या चाळीत स्वत: रहात आहेत. अशा लोकांवर मंडळाची फसवणूक केल्याबद्दल फौजदारी गुन्हा दाखल करु शकतो, तसेच त्यांचा संक्रमण गाळा मंडळ ताब्यात घेउ शकते. याबाबत अधिक माहिती देताना मा. सदस्य श्री. दगडू सकपाळ यांनी सांगितले की हया दोन चाळींची संयुक्त पुनर्बांधणी योजना राबविण्याचा निर्णय होउन १४ वर्षे झालेली आहेत. सध्या या इमारतींमध्ये २४ लोक रहातात, त्यांनी सदर इमारतीतील जे भाडेकरु संक्रमण शिबिरात गेलेले आहेत त्यांचेही गाळे ते वापरत आहेत. त्या लोकांना मंडळाच्या कार्यालयातूनच गोपनीय माहिती दिली जाते. ज्या लोकांना संक्रमण शिबिरात जागा देउनही ते रहावयास गेलेले नाहीत, अशा लोकांना २४ तासात पोलीसांच्या मदतीने मूळ गाळयातून बाहेर काढण्यात यावे अशी त्यांनी सूचना केली.

मुख्य अधिकारी यांनी माहिती दिली की, या प्रकाराबाबत मा. सदस्य श्री. उसपकर यांनी त्यांना माहिती दिलेली असून कुलाबा संक्रमण शिबिरास त्यांनी भेट दिलेली आहे. असे प्रकार कसे होतात व मंडळ कोठे चुकते याचा अभ्यास करीत आहेत. अनधिकृतपणे गाळा बळकावण्याचे जे प्रकार वारंवार होत आहेत या प्रकारास कसा आळा घालावा या दृष्टीने त्या प्रयत्नशील आहेत. जे कर्मचारी/अधिकारी गैरप्रकार करतील त्यांच्यावर कडक कारवाई करण्यात येईल व त्यांची चौकशी करण्याचे आदेश देण्यात येतील असे आश्वासन दिले. त्यांनी अशी माहिती दिली की, संक्रमण शिबिरातील गाळा रिक्त करुन दिल्यानंतरच भाडेकरुना पुनर्रचित गाळयाचा ताबा दिला जातो. त्यामुळे संक्रमण गाळा रिकामा झाला असे रेकॉर्डवर आले पाहिजे. परंतु रेकॉर्डवर तसे येत नसेल म्हणून घुसखोरी केली जाते. त्यामुळे मंडळाचा रेकॉर्ड चुकीच्या पध्दतीने ठेवला किंवा कसे याबाबत त्यांना अभ्यास करावा लागेल. वारंवार होणारी घुसखोरी कशी टाळता येईल या दृष्टीने ठोस यंत्रणा/उपाययोजना करण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल असे मुख्य अधिकारी यांनी आश्वासन दिले.

मा. सदस्य श्री. विश्वासराव यांनी असे मत व्यक्त केले की, वारंवार होणा-या घुसखोरीस प्रामुख्याने भाडेवसुलीकार जबाबदार असतात. कारण घुसखोरांना भाडेवसुलीकार सहकार्य करतात. यावर मुख्य अधिकारी यांनी सांगितले की, निदर्शनास येणा-या अशा भाडेवसुलीकारांवर कडक कारवाई करण्यात येईलच. परंतु अनेक अशी प्रकरणे मंडळाच्या नजरेस येत नाहीत. म्हणूनच अशा सर्वच प्रकारांना आळा बसेल अशी योजना आखण्याची गरज असल्याचे मत त्यांनी प्रतिपादन केले.

मा. सभापती यांनी माहिती दिली की, गोरेगांव संक्रमण शिबिरातील अनेक घुसखोरांना पोलीसांच्या मदतीने बाहेर काढण्यात आले, गाळयाचे दरवाजे, खिडक्या काढून आणल्या तरीही तेथे वारंवार घुसखोरी होत असते.

..... १०/-

यावर मा. सदस्य श्री. सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, गोरेगांव, ओशिवरा सारख्या ठिकाणी जी वारंवार घुसखोरी होते ती थांबविणे शक्य आहे. एकदा घुसखोरांना बाहेर काढल्यानंतर पुन्हा घुसखोरी होऊ नये म्हणून ४-५ दिवसां-करीता पूर्ण वेळ जर पोलीस पहारा ठेवल्यास घुसखोरीस सहज आळा बसेल, परंतु सरकारी मालमत्ता असल्यामुळे अशी कार्यवाही केली जात नसल्याबद्दल खेद व्यक्त केला.

मा. सदस्य श्री. मोडक यांनी असे मत व्यक्त केले की, वारंवार होणा-या घुसखोरीमागे संबंधित भाडेवसुलीकारांचा हात असतो अशी नेहमी शंका व्यक्त केली जाते त्यामुळे ठराविक कालावधीनंतर भाडेवसुलीकारांची त्यांच्या भागातून बदली केल्यास त्याचे चांगले परिणाम दिसून येतील. कारण आताचे भाडेवसुलीकार आपली कोणी बदली करणार नाही ह्या समजूतीने ते कामाची व्यूहरचना करतात. म्हणून त्यांची बदली केल्यास प्रशासनाचे नियंत्रण त्यांच्यावर आहे याची त्यांना जाणीव होईल.

मा. सभापती यांनी सन्मा. सदस्यांच्या तीव्र भावना लक्षात घेउन पुढील आठवडयात ते स्वत:, मुख्य अधिकारी, सहमुख्य अधिकारी व संबंधित मिळकत व्यवस्थापक, सहाय्यक मिळकत व्यवस्थापक, प्रमुख भाडेवसुलीकार, यांची खास बैठक घेऊन कोणती कारवाई करणे गरजेचे आहे तसेच घुसखोरीस कसा आळा बसेल याबाबत आढावा घेण्यात येईल. असे प्रतिपादन केले.

मा. सदस्य श्री. दिवाकरराव यांनी मागणी केली की, सन्मा. सदस्यांनी लेखी स्वरुपात तक्रार देऊन ६ महिने झाले त्याबाबत काय कार्यवाही करण्यात आली याची माहिती देण्यात यावी.

मा. सदस्य श्री. भुवड यांनी असे निदर्शनास आणले की, गोरेगांव, किंवा मालवणी येथील संक्रमण गाळा पैसे देऊन कुलाबा येथे बदलून घेतला जातो व त्यानंतर तो गाळा मोठया रकमेने विकला जातो व हा प्रकार आता वाढत ~~चालला~~ आहे.

यावर मा.सभापती यांनी माहिती दिली की, संक्रमण गाळे बदलून द्यायचे नाहीत. परंतु बदलून मागण्याचे कारण जर संयुक्तीक असेल तर मुख्य अधिकारी यांच्या मंजूरी नंतरच बदलून देण्यात यावा असे आदेश आहेत. तरीही जर गाळे बदलून देण्यात येत असतील तर मुख्य अधिकारी याची दखल घेतील असे आश्वासन दिले.

मा. सदस्य श्री. साटम यांनी असे मत व्यक्त केले की, घुसखोरांना काढण्यासाठी मोहीम हाती घेतली जाते, परंतु स्थानिक पातळीवर त्या भागात लोकांना सांगण्यात येते त्यांना बाहेर काढण्यात येणार आहे. खरे तर घुसखोरांना

...... ११/-

बाहेर काढावयाचे असते परंतु भाडेवसुलीकार लोकांची दिशाभूल करुन वातावरण तापवतात व त्याचा परिणाम घुसखोरांना बाहेर काढण्याच्या कारवाईवर होऊन सदर कारवाई थांबवावी लागते.

मा.सभापती यांनी अधिक माहिती देताना सांगितले की, २०९७ घुसखोरांना बाहेर काढण्याचा निर्णय मा. मंत्री महोदय यांच्याबरोबर झालेल्या चर्चेत घेण्यात आला. त्यानुसार १५ मे ९८ नंतर तारीखवार कार्यक्रम निश्चित करण्यात आला. त्यासाठी मुंबईच्या पोलीस आयुक्तांनीसुध्दा योग्य ती मदत देण्याचे मान्य केले. परंतु मंत्री मंडळातील एका सन्माननीय सदस्याने गृहनिर्माण मंत्र्यांना विनंती केली की त्यांच्या विभागातील घुसखोरांना २५ मे पर्यंत काढू नये. याबाबत मा. मंत्री महोदयांनी आपली अगतिकता मा. सभापतींना सांगितली की, एका मतदारसंघात स्थगिती दिली व दुस-या मतदार संघात स्थगिती दिली नाही व कोणी न्यायालयात रिट दाखल केले तर ती चूक होईल. हे मा.मंत्री महोदयांचे म्हणणे त्यांना पटले. त्यांनी सर्व सन्मा.सदस्यांच्या अनुमतीने घुसखोरांना स्थगिती देणे अयोग्य असून त्यांना बाहेर काढण्यात यावे असे मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे मत आहे, तसेच कोणत्याही घुसख घुसखोरांना अभय देऊ नये, कारण अभय दिल्यास दलालांनी केलेल्या कामगिरीला मान्यता दिल्यासारखे होईल व बेकायदेशीर गोष्टी करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळेल असे मंडळातर्फे शासनास कळविण्यात येईल.

सविस्तर प्रदिर्घ चर्चेनंतर विषयांकित माहितीची सर्वांनी नोंद घेतली.

बाब क्रमांक : ५३/४

[अ] विषय :-पुनर्रचित इमारतीमधील घुसखोरांनी व्यापलेल्या गाळ्यांच्या न्यायालयीन/सक्षम प्राधिकारी/ अपिल अधिकारी यांच्याकडील प्रलंबित असलेल्या प्रकरणांचा दि. १०.६.९८ रोजी पर्यंतचा गोषवारा.

विषयांकित गोषवारा सर्व सन्मा.सदस्यांच्या माहितीसाठी पृष्ठ क्र.१२९ वर सादर करण्यात आला आहे.

माहितीशी पडताळून पहावी.

मा. सदस्य श्री. मोडक यांनी असे निदर्शनास आणले की, स्वामी सदन सिताराम जाधव मार्ग, येथील २० लोकांची न्यायालयीन चौकशी अजूनही चालू आहे. त्यामुळे तक्त्यात देण्यात आलेली माहिती बरोबर नाही.असे वाटते.

मा. सभापती यांनी मा. सदस्य श्री. दगडु सकपाळ यांच्या मताशी सहमती दर्शवून असे निदर्शनास आणले की, एक वर्षापूर्वी विधी शाखेस सूचना देण्यात आल्या होत्या की न्यायालयीन प्रकरणांची सविस्तर माहिती विधी शाखेने मंडळाच्या बैठकीत सादर करावी. तरीही त्याप्रमाणे माहिती देण्यात येत नाही. तरी पुढील बैठकीत सविस्तर माहिती संबंधित विभागाशी विचारविनिमय करुन सादर करावी; असे निर्देश मा. सभापती यांनी संबंधितांना दिले.

[illegible] : [illegible]

ब] विषय :- जुन्या व मोडकळीस आलेल्या उपकरपात्र इमारतीतील भाडेकरु/रहिवाशांना त्यांच्या इमारती तोडून पुनर्रचित करण्यासाठी देण्यात येणा-या व्हेकेशन नोटीसांबाबत.

उपरोक्त विषयाची टिप्पणी पृ.क्र. १३१ ते १३३ वर सादर करण्यात आली आहे.

विषयांकित प्रकरणाबाबत चर्चा करताना मा.सभापती यांनी माहिती दिली की, एकाच रहिवाशाच्या नांवे जर दोन किंवा तीन स्वतंत्र गाळे असतील व त्याने काही कारणांमुळे त्या आपल्या मुलांच्या नांवे केल्या नसतील तर मंडळातर्फे पुनर्रचित इमारतीत त्या गाळ्यांचे एकूण क्षेत्रफळ लक्षात घेऊन एकच गाळा देण्यात येत असे व हे त्याच्यावर अन्यायकारक होते. कारण त्याने त्यांच्या मुलांसाठी वेगवेगळ्या खोल्या घेतलेल्या असतात. म्हणून यापुढे दोन किंवा तीन स्वतंत्र अस्तित्व असलेले गाळे एकाच रहिवाशाच्या नांवे असतील व त्या गाळ्यासाठी स्वतंत्रीरत्या उपकर भरण्यात येत असेल तर त्या प्रत्येक स्वतंत्र गाळ्यासाठी वेगवेगळी व्हेकेशन नोटीसा देण्यात यावी व पुनर्रचित इमारतीत वेगवेगळे गाळे देण्यात यावेत असा प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे. कारण यामुळे मुंबई शहरातील मध्यमवर्गीय कुटुंबांवर अन्याय होणार नाही.

.... १४/-

यावर आपले मत व्यक्त करताना मा. सदस्य श्री. साटम यांनी सांगितले की हा चांगला प्रस्ताव आज बैठकीमध्ये मांडण्यात आला असून याच्या निर्णयामुळे जुन्या चाळीतील रहिवाशांना होणारा त्रास टळणार आहे. तरी या निर्णयास जास्तीत जास्त प्रसिध्दी देण्यात यावी..

मा. सदस्य श्री. भुवड यांनी सदर निर्णयाचे स्वागत करुन, अशी शंका उपस्थित केली की, एकच मोठा गाळा असेल तर त्या गाळयाच्यामध्ये भिंत बांधून दोन गाळे करण्यात येतील व दोन भाडे पावत्या घेतल्या जातील. असे होऊ नये याची संबंधितानी योग्यती काळजी घ्यावी, कारण अशावेळी इमारतीचा मालक पैसे घेऊन भाडे पावती देतो व भाडेपावती असल्याकारणाने रेशनकार्ड, मतदान यादीचा उतारा असे कागदपत्र मिळविले जातात. म्हणून इमारतीचा ब्लॉक प्लॅन पाहूनच नंतरच स्वतंत्र खोल्यांसाठी वेगवेगळ्या व्हेकेशन नोटीसा देण्यास हरकत नाही असे मत व्यक्त केले.

मा.सदस्य श्री. उसपकर यांनी असे मत व्यक्त केले की, गिरगांव विभागांत अनेक वर्षापासून ब-याच खोल्यामध्ये लाकडाचे पार्टीशन टाकून दोन खोल्या केलेल्या आहेत. त्यांना वेगवेगळ्या खोल्या देणार का ? अशी विचारणा करता मा. सभापती यांनी माहिती दिली की, खोल्यांमध्ये पार्टीशन कितीही असली व भाडेपावतीवर एकच खोली क्रमांक दर्शविण्यात आला असेल तर एकच गाळा देण्यात येईल.

मा. सदस्य श्री. उसपकर यांनी विचारणा केली की काही खोल्यांमध्ये पोटमाळा बनविण्यात आलेला असतो व तेथे पोटभाडेकरु रहात असतो त्याचे वेगळे रेशनकार्डही असते अशा लोकांना स्वतंत्र गाळा देणार का ? यावर मा. सभापती यांनी स्पष्ट खुलासा केला की, खोलीत जरी अनेक कुटुंबे रहात असतील परंतु भाडेपावतीवर एकच खोली क्रमांक दर्शविण्यात आला असेल तर एकच व्हेकेशन नोटीस देऊन पुनर्रचित इमारतीत एकच गाळा मिळावयास तो पात्र असेल..

मा. सदस्य श्री. मोडक यांनी सदर प्रस्तावाचे स्वागत करुन असे निदर्शनास आणले की, लालबाग येथील बावला कंपाऊंड नांवाची मालमत्ता मंडळाने संपादित केलेली आहे व तेथील खोल्यांमध्ये ब-याच वर्षापासून दोन दोन कुटुंबे रहात असून त्यांचे वास्तव्याचे वेगवेगळे पुरावे आहेत. परंतु त्यांच्या नांवावर

..... १५/-

खोल्या करण्यामध्ये काय अडचणी आहेत ? यावर मा. सभापती यांनी श्री. मोडक, यांना विनंती केली की, त्यांनी याबाबत काही तांत्रिक बाबी पूर्ण करावयाच्या राहिल्या असतील तर त्यांनी संबंधिताना भेटावे म्हणजे त्यातून मार्ग काढण्यात येईल.

मा. सदस्य श्री. गोडांबे यांनी असे मत व्यक्त केले की, इमारतीतील मूळ गाळयांच्या संख्येपेक्षा अधिक गाळे व रहिवाशी वाढवून दाखविण्याची शक्यता मालकाकडून व मंडळाच्या अधिका-यांकडून होण्याची शक्यता लक्षात घेऊन इमारतीचा ब्लॉक प्लॅन व भाडेपावती किती वर्षापूर्वीची आहे हे पहाणे अतिशय महत्वाचे आहे.

मा. सभापती यांनी सचिव श्री. सावंत यांना असे निर्देश दिले की, पु.क्र. १३१ वर सादर प्रस्तावात सुधारणा करण्याची गरज असल्याचे सांगून प्रस्तावात ३ -या परिच्छेदात नमूद केलेले आहे की, "यामुळे प्रचलित पध्दतीनुसार एका गाळेधारकाच्या जुन्या इमारतीतील १०० चौ.फुटाच्या दोन खोल्या" या वाक्यामध्ये प्रचलित पध्दतीनुसार या शब्दापुढे "उदाहरणार्थ" हा शब्द घालण्यात यावा व सदर वाक्य "यामुळे प्रचलित पध्दतीनुसार उदाहरणार्थ एका गाळेधारकाच्या जुन्या इमारतीतील" अशा अर्थाचे असले पाहिजे. यास सर्वांनी सहमती दर्शवून सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ५३/ ४०८

उपकर प्राप्त इमारतीतील भाडेकरु/रहिवाशांना त्यांच्या इमारती तोडून पुनर्रचित करण्यापूर्वी देण्यात येणा-या व्हेकेशन नोटीसाबाबत खालील प्रमाणे मान्यता देण्यात येवून सदर कार्यवृत्तांत स्थायी होण्याची वाट न पहाता कार्यवाही करण्यास मंजूरी देण्यात आली. सदर निर्णय आजच्या तारखेपासून अमलात येईल.

[१] भोगवटादार/भाडेकरु/रहिवाशी यांच्या नांवे जुन्या इमारतीत एका पेक्षा अधिक गाळे असल्यास व संबंधिताकडे वेगवेगळया भाडे-पावत्या असल्यास, तसेच स्वतंत्र दुरुस्ती उपकर लावलेला असेल, ब्लॉक प्लॅनशी जुळत असेल अशाना वेगवेगळया व्हेकेशन नोटीसा देण्यात याव्यात तसेच ते पुनर्रचित इमारतीत स्वतंत्र गाळे मिळण्यास पात्र ठरतील.

[२] एखादा भागवटादार/भाडेकरू/रहिवाशांचे नांवे एकच भाडेपावती असून त्या भाडेपावतीवर एकापेक्षा अधिक स्वतंत्र गाळ्याचे/खोल्यांचे नंबर दर्शविण्यात आलेले असल्यास व भोगवटादार/भाडेकरू/रहिवाशांकडे त्यांचा ताबा असल्यास तसेच सदर गाळ्या/खोल्या पोटी स्वतंत्र उपकर भरलेला असल्यास भाडेपावती दर्शविलेल्या सर्व गाळ्यांसाठी वेगवेगळ्या व्हेकेशन नोटीसा देण्यात याव्यात तसेच पुनर्रचित इमारतीतही त्यानुसार वेगवेगळे गाळे मिळण्यास ते पात्र ठरतील.

—xox—

दक्षिण परिमंडळ

===========

[अ] विषय :- जुनी उपकरपात्र इमारत २१३-२१५, झवेरी भुवन ताडदेव, मुंबई-७ येथील मंडळाच्या दुरुस्ती कामास महानगरपालिकेने जारी केलेल्या काम थांबविण्याच्या सूचना पत्राबाबत.

उपरोक्त प्रस्ताव पृ.क्र. द-१ ते द-५ वर सादर करण्यात आला आहे. विचाराधिन प्रस्तावाची संक्षिप्त माहिती उपमुख्य अभियंता [द.] श्री. वणिकर यांनी सभागृहास दिली.

यावर संबंधित म.न.पा अधिकाऱ्याने माहिती दिली की, म.न.पा. आयुक्तांकडे सदर प्रकरण पाठविलेले असून एक-दोन दिवसांत याबाबत आदेश प्राप्त होतील. आदेश प्राप्त होताच ते मंडळास कळविण्यात येतील.

यावर मा. सभापती यांनी विचारणा केली की, पावसाळा जवळ आलेला असून, जर काही दुर्घटना होऊन मनुष्यहानी झाली तर जबाबदारी कोण घेणार ? म्हणून म.न.पाने काम थांबविण्याची नोटीस मागे घेऊन तात्काळ दुरुस्तीसाठी परवानगी द्यावी.

मा. सदस्य श्री. उसपकर यांनी निदर्शनास आणले की या प्रकरणाबाबत मागील बैठकीत ८ दिवसांत अहवाल सादर करण्याचे आश्वासन दिले होते. पण त्याबाबत काहीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

मा. सभापती यांनी सर्व सन्मा. सदस्यांच्या भावना लक्षात घेवून म.न.पाच्या उपस्थित अधिकाऱ्यांस अशा सूचना दिल्या की सदर प्रकरण कोणत्या स्तरावर आहे याची माहिती त्यांना मंगळवारपर्यंत द्यावी, जेणेकरून इमारतीची धोकादायक परिस्थिती लक्षात घेता वरील पातळीवर चर्चा करून त्वरीत मार्ग

काढता येईल. तसेच मंडळाच्या दुरुस्ती कामास सुरुवात करण्यास त्वरीत महानगर पालिकेच्या संबंधित विभागाने परवानगी द्यावी अशी मागणी करण्यात आली.

[२] विषय :- दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतीच्या दुरुस्तीच्या कामाचे मूळ व सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकाना प्रशासकिय मंजूरी प्रदान करणे-बाबतचे प्रस्ताव.

---

जुन्या व मोडकळीस आलेल्या दक्षिण परिमंडळातील उपकर पात्र इमारतींच्या दुरुस्ती कामाचे प्रस्ताव पृ.क्र. द-३९ ते द-३५१ वर सादर करण्यात आले आहेत.

पृ.क्र. द-५१ वरील इ.क्र. २०-२४-अे, शहीद भगतसिंग रोड, तिसरा टप्पा-या इमारतीच्या प्रस्तावाबाबत चर्चा करताना मा. सदस्य श्री. उसपकर यांनी निदर्शनास आणले की, १९८० पर्यंतच उपकर भरलेला आहे. यावर श्री. वनीकर, उपमुख्य अभियंता यांनी सदर इमारतीचा ताबा कोर्ट रिसीव्हरकडे असल्याचे सांगितले. तर म.न.पा अधिका-याने माहिती दिली की, सदर इमारतीचे भाडे कोर्ट रिसीव्हरकडून वसूल करण्यात येते व म.न.पा.कडे दिले जाते, त्यामुळे सदर मालमत्ता लिलावात काढता येत नाही.

यावर मा. सभापती यांनी असे मत व्यक्त केले की, जरी मालमत्ता कोर्ट रिसीव्हरच्या ताब्यात असली तरी संबंधित कर त्यांनी द्यावयाचे नाहीत असे नाही. याबाबत म.न.पा.ने कायदेशीर सल्ला घ्यावा व कार्यवाही करावी, सदर बाब न्यायालयात न्यायाधिशांच्या निदर्शनास आणावी व या प्रकरणा-बाबत पुढील बैठकीत माहिती द्यावी ह्या अटीस अधिन राहून प्रस्तावास मंजूरी देण्यात आली.

इ.क्र. १०४-११०, टनटनपुरा रोड, ह्या इमारतीच्या प्रस्तावाबाबत चर्चा करताना मा. सदस्य श्री. उसपकर यांनी असे निदर्शनास आणले की, इमारतीचा वरचा मजला ब्लॉक प्लॅनशी जुळत नाही. याबाबत त्यावेळच्या अधिका-यांनी कोणती कारवाई केली ? याबाबत श्री. वनीकर, उपमुख्य अभियंता यांनी माहिती दिली की, वाढीव मजला ब्लॉक प्लॅनशी जुळत नसला तरी त्या मजल्याची दुरुस्ती करणे सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून गरजेचे असते.

...... १८/-

यावर मा. सभापती यांनी सुचविले की, जर वाढीव बांधकाम म.न.पा.ने नियमित केले नसेल, व उपकरपात्र नसेल तर त्या मजल्याची दुरुस्ती करावी किंवा कसे याबाबत विधी-सल्लागार यांचा सल्ला घ्यावा व अनधिकृत बांधकाम करण्याच्या प्रवृत्तीस आळा घालण्यासाठी वाढीव मजल्याची दुरुस्ती न करता शासनाच्या निदर्शनास सदर प्रकरण आणून शासनाचे मार्गदर्शन घ्यावे.

मुख्य अधिकारी यांनी असे मत व्यक्त केले की, जर वाढीव मजला अनधिकृत असेल तर तो पाडून टाकण्यात यावा. व खालच्या मजल्याची दुरुस्ती करण्यात यावी. यावर सदर अनधिकृत बांधकाम पाडण्याची जबाबदारी म.न.पा.ची आहे असे वनीकर, उपमुख्य अभियंता यांनी निदर्शनास आणून दिले.

मा. सदस्य श्री. सकपाळ यांनी असे मत व्यक्त केले की, इमारतीच्या दुरुस्तीमध्ये वाढीव अनधिकृत बांधकामाची दुरुस्ती करत राहिल्यास मुंबईमध्ये अशाप्रकारे अनधिकृतपणे वाढीव मजले बांधण्याची प्रवृत्ती वाढेल.

मा.सदस्य श्री. भुवड यांनी असे मत व्यक्त केले की, मंडळाच्या २९३-२९५, झवेरी भुवनच्या इमारतीबाबत सतर्कता दाखवून म.न.पा.ने दुरुस्तीचे काम थांबविण्याची जशी नोटीस दिली तशी सतर्कता ह्या विषयांकित इमारतीत अनधिकृतपणे वाढीव मजला बांधण्यात येत असताना का दाखविली नाही ?

श्री. वनीकर, उपमुख्य अभियंता यांनी असे निदर्शनास आणले की, मंडळ अशा प्रकरणी वाढीव चौथा मजला C1 ब्लॉक प्लॅनमध्ये नाही, तो अनधिकृत आहे, त्यामुळे म.न.पा.ने त्यावर कारवाई करावी असे मंडळ म.न.पा.स कळवू शकते. म.न.पा.ने जर सदर बांधकाम नियमित केले असेल तर ते तपासून पहाण्यात येईल.

सविस्तर चर्चेअंती मा.सभापती यांनी सूचना दिल्या की, याबाबत म्हाडाच्या विधी सल्लागारांचेही मत घ्यावे व म.न.पा.शी चर्चा करुन अशा प्रकारच्या प्रकरणी धोरणात्मक निर्णय घ्यावा. तुर्तास सदर प्रस्ताव प्रलंबित ठेवावा असे ठरले.

पृ.क्र. द-१३३ वरील इ.क्र. १९१-१९२ निशाणपाडा रोड ह्या इमारतीचा उपकर १९८९ सालापर्यंतच भरलेला आहे. असे मा.सदस्य श्री. उसपकर यांनी निदर्शनास आणले व पुढील बैठकीत याबाबत काय कार्यवाही केली त्याची माहिती द्यावी अशी सूचना केली.

पृ.क्र. १५७ वरील इ.क्र. ६०-६० ए, ९३-१०३ भुलेश्वर रोड या इमारतीच्या प्रस्तावाबाबत मा. सदस्य श्री. उसपकर यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाबाबत उपमुख्य अभियंता [द] श्री. वनीकर यांनी खुलासा करुन सांगितले की, दुस-या टप्प्याचे सदर इमारतीचे १३००.०० चौ.मी. क्षेत्रफळ दाखविलेले आहे ते बरोबर असून त्याची त्यांनी खात्री केली आहे. तरी तिस-या टप्प्याच्या क्षेत्रफळात तशी दुरुस्ती करावी अशी विनंती केली.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्ताव मंजूर करण्यात आला.

पृ.क्र. द-२६१ वरील इ.क्र. १२, खत्तवाडी ४ था टप्पा या इमारतीच्या प्रस्तावाबाबत मा.सदस्य श्री. उसपकर यांनी विचारणा केली की, या इमारतीशेजारी दोन भूखंड बरेच वर्षे पडून आहेत. म्हणून या इमारतीची दुरुस्ती ४ थ्या टप्प्यात न घेता सदर दोन भूखंडासह संयुक्त पुनर्बांधणी योजना राबविण्यात का येत नाही ? सुकथनकर समितीच्या अहवालाप्रमाणे लोकांचा फायदा होत असेल तर हया इमारतीचे पुनर्बांधणी करण्यास काय हरकत आहे. यावर श्री. वनीकर यांनी खुलासा केला की, हया इमारतीच्या लोकांना त्यांच्या इमारतीची पुनर्बांधणी केल्यास २२५ चौ.फुटाचे गाळे मिळतील याची कल्पना दिली होती. परंतु ते ऐकत नाहीत व दुरुस्तीसाठी अधिक खर्च येणार असल्यामुळे, तेवढया पैशाची ते व्यवस्था करतील असे भाडेकरुंचे म्हणणे आहे. मा. सदस्य श्री. उसपकर यांनी मा. सभापती यांना विनंती केली की, सदर इमारत संयुक्त पुनर्बांधणी योजने अंतर्गत पुनर्बांधणी करण्याबाबत लक्ष घालावे.

यावर मा. सभापती यांनी असे सुचविले की, संबंधित इमारतीच्या रहिवाशांकडून व मा.आमदार श्री. मिर्लेकर यांच्याकडून सदर इमारतीची दुरुस्ती न करता पुनर्बांधणी करावी असे लेखी आल्यास पुनर्बांधणीची कार्यवाही करता येईल, तोपर्यंत सदर प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नसावी.

सविस्तर चर्चेअंती विषयांकित इमारतीच्या दुरुस्ती कामास मंजूरी देण्याचे ठरले.

पृ.क्र. २६९ वरील इमारत क्रमांक १०७-बी तात्या घारपुरे पथ या इमारतीचा संभाव्य खर्च रु. २५४५९/- ऐवजी रु. ७०३१/- असा दुरुस्त करावा अशी श्री. वनीकर, उपमुख्य अभियंता यांनी विनंती केली.

मा.अध्यक्षांच्या परवानगीने उपमुख्य अभियंता [द] श्री. दनीकर यांनी इ.क्र. १०५, भंडारी स्ट्रीट या इमारतीचे ई-टप्प्याचे सुधारीत अंदाजपत्र सर्व सन्मा. सदस्यांना सादर केले. सविस्तर चर्चेअंती कामाची निकड लक्षात घेता सदर प्रस्ताव सर्वानुमते मंजूर करण्याचे ठरले.

प्रदिर्घ चर्चेअंती दक्षिण परीमंडळातील सर्व दुरुस्ती कामाच्या प्रस्तावावर चर्चा होऊन सन्मा. सदस्यांनी केलेल्या सूचना व घेतलेल्या हरकतीच्या आधिन राहून मान्यता देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ५३/ ४०९

दक्षिण परीमंडळातील परिशिष्ट "अ" मधील उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या प्रस्तावाना सन्मा. सदस्यांनी घेतलेल्या हरकती व सुचनांच्या आधीन राहून सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

बाब क्रमांक : ५३/६ [उत्तर परिमंडळ]

विषय :- उत्तर परिमंडळातील उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्तीच्या कामाचे मूळ व सुधारीत नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याबाबतचे प्रस्ताव.

विषयांकित प्रस्ताव पृ.क्र. उ-१ ते उ-३०३ वर मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

पृ.क्र. उ-७१ वरील इ.क्र. २४४-२५०, सी, बाप्टी रोड, कामाठीपुरा या इमारतीबाबत उपमुख्य अभियंता [उत्तर] श्री. भुवनदास यांनी माहिती दिली की, सदर इमारतीचा उपकर १९८३ पासून न भरल्यामुळे सदर मालमत्तेवर म.न.पा. ने टाच आणलेली आहे.

यावर मा.सभापती यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, सदर मालमत्तेवर म.न.पा.ने अशासाठी टाच आणली असेल की, सदर घरमालकाने मंडळाचा उपकर भरला नसेल, किंवा मंडळाचा उपकर अधिक म.न.पा.चा मालमत्ता कर भरण्यात आला नसेल. जर मंडळाचा उपकर न भरल्यामुळे जर मालमत्तेवर टाच आणली असेल तर ती मालमत्ता म.न.पा.ने मंडळास हस्तांतरीत केली पाहिजे. व म.न.पा.

मालमत्ता कर भरण्यात आला नसेल व उपकर भरण्यात आला असे तर म.न.पा. सदर मालमत्ता संपादित करुन उपकराची जी काही रक्कम आहे ती मंडळास देण्यात यावी. त्यांनी सूचना केली की, याबाबत विधी सल्लागार याचे मत मागवावे व पुढील बैठकीत माहिती द्यावी. असे म.न.पा.च्या संबंधित अधिका-यांना निर्देश दिले.

चर्चेच्या ओघाओघात मा. सभापती यांनी असे निदर्शनास आणले की, उत्तर परिमंडळातील सादर करण्यात आलेली अंदाजपत्रके ही रु. १०००/- च्या मर्यादेच्या जवळपास आणलेली आहेत. अशा त-हेने जर रु. ९००/- किंवा रु.९५०/- खर्च करावयाचे असतील तर इमारत संरचनात्मकदृष्ट्या अतिशय चांगल्या प्रकारे दुरुस्ती करण्यात यावी. मर्यादा वाढलेली आहे म्हणून जास्त काम वाढवू नये, नाही तर पुढे ५-१० वर्षांनी सदर इमारतीच्या दुरुस्तीसाठी पैसेच शिल्लक राहाणार नाहीत. तरी संबंधितानी अंदाजपत्रक तयार करताना योग्य ती काळजी घ्यावी अशी सुचना केली.

श्री. भुवनदास यांनी माहिती दिली की, त्यांच्याकडे अंदाजपत्रके तयार होती परंतु मर्यादा वाढली नसल्याने ती पडून होती. आता मर्यादा वाढल्यामुळे ती सादर करण्यात आली असून आवश्यक तेवढाच खर्च करण्यात येत आहे.

उत्तर परिमंडळाच्या सर्व प्रस्तावांवर प्रदिर्घ चर्चा होऊन चर्चेअंती सन्मा. सदस्यांनी केलेल्या सूचना व घेतलेल्या हरकतीच्या आधिन राहून मान्यता देण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ५३/४१०

उत्तर परिमंडळातील परिशिष्ट "ब" मधील उपकरपात्र इमारतींच्या दुरुस्ती कामाच्या प्रस्तावांना सन्मा. सदस्यांनी घेतलेल्या हरकती व सुचनांच्या अधिन राहून सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

—xxx—

बाब क्रमांक : ५३/७

विषय :- अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी घेण्यात येणारे विषय.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने मुंबई बेटावरील "अ" वर्गातील जुन्या उपकरपात्र इमारतींच्या पुनर्विकासासाठी "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्याचे खालील चार प्रस्ताव सन्मा. सदस्यांच्या माहितीसाठी व मंजूरीसाठी सादर करण्यात आले.

१] भूकर पहाणी क्र. २१, मलबार हिल विभाग, बाणगंगा रोड, वाळकेश्वर, मुंबई.

२] भूकर पहाणी क्र.१०८०, गिरगांव विभाग, इ.क्र.५, डॉ. माणेकर स्ट्रीट, डी-विभाग, मुंबई.

३] भूकर पहाणी क्र. १-बी/६४३ माझगांव विभाग, इ.क्र. २४१-५३, घोडपदेव मार्ग, "पैंम मंझिल", मुंबई.

४] भूकर पहाणी क्र.. ६५५, गिरगांव विभाग इ.क्र.१९-२१ डॉ. देशमुख लेन, "लक्ष्मी भवन" डी-विभाग, मुंबई.

वरील प्रस्तावावर चर्चा करताना मा. सभापती यांनी अशी माहिती दिली की, शासनाने २.०० च.क्षे.नि. ऐवजी २.५ च.क्षे.नि. देण्याचे धोरण स्विकारलेले आहे. विकासकार ७० % रहिवाशांची संमती घेऊन सदर धोरण अंमलात येण्याची वाट पहात होते. परंतु आता भाडेकरू थांबण्यास तयार नाही म्हणून विकासकांनी च.क्षे.नि. २.०० प्रमाणे "ना हरकत प्रमाणपत्र" देण्याची विनंती केलेली आहे, त्यानुसार विषयांकित चार प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत. त्यापैकी भूकर पहाणी क्र. २१ मलबार हिल विभाग, बाणगंगा रोड, वाळकेश्वर मुंबई ह्या मालमत्तेचा प्रस्ताव २६.८.९३ रोजीच्या मंडळाच्या बैठकीत ठेवून हेरीटेजचे "ना हरकत प्रमाणपत्र" सादर करण्याच्या अटीस अधिन राहून प्रस्ताव प्रलंबित ठेवण्यात आला होता. आता विकासकाने हेरीटेज कमिटीचे "ना हरकत प्रमाणपत्र" सादर केलेले आहे. तसेच उर्वरीत तिन्ही प्रस्तावामध्ये ७० % भाडेकरु/रहिवाशांची संमती असून संबंधित विभागाने भाडेकरु/रहिवाशांची यादी तपासली असून प्रस्ताव योग्य आहेत.

सविस्तर चर्चेअंती चारही प्रस्तावांना मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ५१/४११

मुंबई बेटावरील "अ" वर्गातील उपकरपात्र इमारतीच्या पुनर्विकासासाठी खालील प्रस्तावांना "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

.... २३/-

१] भूकर पहाणी क्र. २१, मलबार हिल विभाग, बाणगंगा रोड, वाळकेश्वर.

२] भूकर पहाणी क्र. १०८०, गिरगांव विभाग, इ.क्र. ५, डॉ. भाजेकर स्ट्रीट, डी-विभाग, मुंबई.

३] भूकर पहाणी क्र. १-बी/६४३, माझगांव विभाग, इ.क्र. २४९/५३, घोडपदेव मार्ग, "फैज मंझील", मुंबई.

४] भूकर पहाणी क्र. ६५५, गिरगांव विभाग, इ.क्र. १९/२१, डॉ. देशमुख लेन, "लक्ष्मी-भवन" डी-वॉर्ड, मुंबई.

---xxx---

मा. सभापतींनी असे निदर्शनास आणले की, सुकथनकर समितीच्या अहवालानुसार मंडळातर्फे जे पुनर्बांधणीचे प्रकल्प राबविण्यात येत आहेत ते प्रकल्प डी.सी. रुल्समध्ये सुधारणा करुन ते अंमलात येईपर्यंत वाट न पहाता ते पूर्ण करुन घेण्यासाठी मा. उप-सचिव श्री. कोकणे यांनी शासन स्थरावर संबंधित खात्याला विनंती करावी, अशी मा. सभापती यांनी सूचना केली. त्यांनी पुढे माहिती दिली की, सुकथनकर समितीचा अंतरिम अहवाल नागपूर येथील १७ डिसेंबर १९९७ च्या अधिवेशनात स्विकारण्यात आलेला आहे. त्यानंतर ३ जानेवारी ९८ रोजी मंत्रीमंडळानेही मान्यता दिलेली आहे. अर्बन डेव्हलपमेंट खात्याने समुद्राजवळील इमारती आणि रस्त्याची रुंदी लक्षात घेउन बांधावयाच्या इमारतींना आक्षेप घेतलेला आहे. परंतु मंडळाच्या इमारतीतील लोक २०-२५ वर्षे संक्रमण शिबिरात खितपत पडलेले आहेत याचा विचार करुन प्रकल्पांस खीळ घालू नये. महानगरपालिकेस प्रति गाळा २२५ चौ.फुट प्रमाणे व ४.०० च.क्षे.नि. प्रमाणे पुनर्बांधणीचे प्रस्ताव सादर करण्यात आलेले आहेत व महानगरपालिकेने ४.०० च.क्षे.नि. प्रमाणे छाननी करुन ३.१९२ च.क्षे.नि. प्रमाणे बांधकाम करण्यास परवानगी देण्यास मंडळाने केलेली विनंती मान्य केली आहे. परंतु त्यांना शासनाकडून तशाप्रकारे मान्यता देण्याचे आदेश प्राप्त होणे आवश्यक आहे.

यावर श्री. करांडे, उपमुख्य अभियंता [पुनर्रचना] यांनी असे निदर्शनास आणले की, महानगरपालिकेबरोबर त्यांची नुकतीच बैठक झाली असून म.न.पा.ने ४.०० च.क्षे.नि.नुसार आराखडे मंजूर करण्यास नकार दिलेला आहे. त्यांचे म्हणणे आहे की, मंडळाने ३.१९२ च.क्षे.नि. व ४.०० च.क्षे.नि. प्रमाणे वेगवेगळे दोन आराखडे सादर करावेत व ३.१९२ च.क्षे.नि.चा आराखडा ते तपासून त्यास मंजूरी देतील.

मा. उपसचिव श्री. कोकणे यांनी असे मत व्यक्त केले की, सुकथनकर समितीच्या संदर्भामध्ये शासनाने जे काही निर्णय घेतलेले आहेत त्याची अंमलबजावणी करण्यासाठी म्हाडा ॲक्ट मध्ये दुरुस्ती केलेली आहे. विधीमंडळाने सुधारणा मंजूर केलेल्या आहेत. डी.सी. रुल्समध्ये ज्या सुधारणा करावयाच्या आहेत त्यासाठी गृहनिर्माण विभाग व नगरविकास विभाग यांच्यात सखोल चर्चा होऊन सुधारीत डी.सी. रुल्स अंतिम मान्यतेसाठी शासनास सादर करण्यात आले आहेत. ते करताना गृहनिर्माण विभागाने काळजी घेतली आहे की, जे काही निर्णय शासनाने घेतलेले आहेत त्यांचा नियमांत सर्वतोपरी अंतर्भाव व्हावा. व सध्याच्या अस्तित्वात असलेल्या नियमांमुळे काही त्यामध्ये बाधा येऊ नये यांचा विचार करण्यासाठी काही कालावधी लागला. परंतु आता आठवडयाभरात सुधारीत डी.सी. रुल्सना मान्यता मिळण्याची आशा वाटते. त्यामुळे मंडळाच्या प्रकल्पांना फारसा विलंब होणार नाही.

श्री. करांडे, उपमुख्य अभियंता यांनी माहिती दिली की, एकूण ५१ प्रकल्पांपैकी २३ प्रकल्पाचे आराखडे म.न.पा.कडे पाठविले असून १२ प्रकल्पांना १५ दिवसांत मान्यता देण्याचे आश्वासन म.न.पा. ने दिलेले आहे.

उप-सचिव श्री. कोकणे यांनी अशी माहिती दिली की, ४.०० च.क्षे.नि. देण्याचे धोरण असले तरी जर पुनर्वसनासाठी त्यापेक्षा जास्त च.क्षे.नि. आवश्यक असेल तर तो देण्यात यावा अशी शासनाने शिफारस केलेली आहे. त्यामुळे म.न.पा.ने ४.०० च.क्षे.नि.चा आराखडयाची छाननी करुन ३.१९२ च.क्षे.नि. मान्यता देणे योग्य नाही. कारण मूळ भाडेकरुनां पुनर्वसनासाठी मंडळास जर ६.०० च.क्षे.नि. जरुरी असेल तर नवीन धोरणानुसार मंडळास तो मिळणार आहे तरी ह्या बाबीचा विचार होणे आवश्यक आहे असे मत व्यक्त केले.

मा. सदस्य श्री. गोडांबे यांनी असे निदर्शनास आणले की, "लक्ष्मीनारायण" ही उपकरपात्र इमारत ह्या वर्षी धोकादायक इमारतींच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहे. सदर इमारतीच्या घरमालकास सदर मालमत्तेचा पुनर्विकास

करण्यासाठी सन १९९१ मध्ये "ना हरकत प्रमाणपत्र" प्रदान केले होते. परंतु अद्याप पर्यंत त्याने काम चालू केले नाही, सदर इमारतीतील काही भाडेकरु सदर इमारतीची दुरुस्ती करु इच्छितात, तर काही भाडेकरुनां पुनर्विकास पाहिजे आहे. तरी मालकास एक संधी देण्यात यावी असे मत व्यक्त केले.

यावर मा. सभापती यांनी प्रतिपादन केले की घरमालक/विकसक यांना "ना हरकत प्रमाणपत्र" दिल्यानंतर बांधकामास किती दिवसांत सुरवात करावयाची ही अट पूर्वी नव्हती. परंतु सुकथनकर समितीने मंडळास अट घातली की, "ना हरकत प्रमाणपत्र" मिळण्यासाठी मंडळाकडे अर्ज प्राप्त झाल्यावर आवश्यक त्या सर्व बाबी पूर्ण असतील तर मंडळाने तीन महिन्यांच्या आत ना हरकत प्रमाणपत्र दिले पाहिजे असे बंधन घातले आहे. परंतु विकसकाने/घरमालकाने किती महिन्यात काम सुरु करावे यावर बंधन नाही. तरी सदरहू इमारतीच्या बाबतीत मानवतेच्या दृष्टीने तसेच वित्त व जीवीत हानी होउ नये म्हणून टेकू लावणे, धोकादायक भाग पाडणे व लोकांना संक्रमण शिबिरात गाळे देण्याची व्यवस्था करण्यात येईल.

